RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ३, अंक ८०] बुधवार, ऑगस्ट ९, २०१७/श्रावण १८, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १३७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ ऑगस्ट २०१७

**अधिसूचना**

**मोटार वाहन अधिनियम, १९८८.**

क्रमांक एमव्हीआर. ०८१५/प्र.क्र. ३८७/परि-२.—मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम १३८ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ज) व कलम २११ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम २१२ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमास, महाराष्ट्र मोटार वाहन (दुसरी सुधारणा) नियम, २०१७ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ यांच्या नियम २२९ च्या पोट-नियम (३) मधील परंतुकाऐवजी खालील परंतुक नव्याने दाखल करण्यात येईल :—

परंतु नमूना टी.ओ.डी.ए. मधील अर्ज खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे शुल्कासोबत दाखल करण्यात येईल :—

| अनुक्रमांक | वाहनाचा प्रकार | शुल्क रुपये |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | दोन किंवा तीन रीजीड ॲक्सल ट्रक | १०,००० |
| २ | ४९,००० कि. ग्रॅ. पेक्षा कमी सकल भार क्षमता असलेला मेकॅनिकल/आर्टीक्युलेटेड ट्रेलर | २५,००० |

| अनुक्रमांक<br>(१) | वाहनाचा प्रकार<br>(२) | शुल्क रुपये<br>(३) |
|---|---|---|
| ३ | मालासहीत वाहनाची मोजमापे लांबी ३३ मीटर, रुंदी ५ मीटर व उंची ६ मीटरपेक्षा कमी असलेला मॉड्युलर हायड्रॉलिक ट्रेलर | ५०,००० |
| ४ | मालासहीत वाहनाची मोजमापे लांबी ३३ मीटर, रुंदी ५ मीटर व ६ मीटरपेक्षा जास्त असलेला मॉड्युलर हायड्रालिक ट्रेलर | १,००,०००. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रकाश साबळे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 9th August 2017.

*NOTIFICATION*

Motor Vehicles Act, 1988.

No. MVR. 0812/C.R. 43/TRA-2.—In exercise of the powers conferred by clauses *(j)* of sub-section *(2)* of section 138 read with section 211 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Motor Vehicles Rules, 1989, the same having been previously published as required by sub-section *(1)* of section 212 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Motor Vehicles (Second Amendment) Rules, 2017.

2. In rule 229 of the Maharashtra Motor Vehicles Rules, 1989, in sub-rule (*3*), for the existing proviso, the following proviso shall be substituted namely :—

" Provided that, the application Form T.O.D.A. shall be accompained with a fee as mentioned in the following table :—

| Serial No. (1) | Types of Vehicles (2) | Fee in rupees (3) |
|---|---|---|
| 1 | Two and three rigid axle truck | 10,000 |
| 2 | Mechancial/articulated trailer having gross vehicle weight upto 49,000 Kg. | 25,000 |
| 3 | Modular by draulic trailer having overall dimension of vehicle including goods/ consignment not exceeding length 33 meter, width 5 meter and height 6 meter | 50,000 |
| 4 | Modular hydraulic trailer having overall dimension of vehicle including goods/ consignment exceeding length 33 meter, width 5 meter and height 6 meter. | 1,00,000 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH SABALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.